**श्री. सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट, रजि. (A - १६) च्या दिनांक २०/०३/२०२२ च्या सर्व साधारण सभेत झालेले ठराव.**

स्थळ : स्वारगेट कॉर्नर, ग्रँड ट्युलिप.
वेळ : सकाळी १०. ३० वाजता

आमच्या समाजाची संस्था ही धर्मदाय आयुक्त कार्यालयात रजिस्टर नंबर A16 आहे. ही संस्था मुख्यतः "श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट" या नावे ओळखली जाते. परंतु आज पर्यंतच्या अनेक कागदपत्रांमध्ये हिचा उल्लेख करताना वेळोवेळी नावामध्ये छोटे-मोठे बदल झाले आहेत. तरी समाजात एकच नाव प्रचलित आहे व इतर अनेक नावाबद्दल समाज सभासदांना कसलीही माहिती दिली गेली नाही. संस्थेची स्थापना स्वातंत्र्यपूर्वकाळात झालेली आहे व स्वातंत्र्य नंतर १९५० च्या कायद्यानुसार तिला सार्वजनिक ट्रस्ट बनवून १९५० च्या कायद्याप्रमाणे कामकाज सुरू आहे. तरी आजपर्यंत समाजाच्या हितासाठी अनेक छोटे मोठे उपक्रम चालू होते. परंतु कागदोपत्री बघितल्यास संस्थेची धर्मदाय आयुक्त कार्यालयात १९९२ च्या कार्यकारणी नंतर समाजातील कोणतीही कार्यकारणी अधिकृतपणे शेड्युल वर आलेली नाही. १८१४/१९९२ बदल अर्ज मंजूर करताना संस्थेची नवीन योजना करण्यासाठीचा आदेश धर्मदाय आयुक्तांनी दिला होता. त्यावेळीच्या कार्यकारिणीतील सदस्यांनी पाठपुरावा केला नाही. त्यामुळे त्यानंतरचे अनेक बदल अर्ज प्रलंबित राहून गेले.

गेल्या २०-२५ वर्षापासून संस्थेचे व्यवस्थापन कायदेशीर रित्या चालू नसल्याचे निदर्शनास येते. वार्षिक सर्वसाधारण सभा वेळोवेळी न घेण्यात येणे, तीन चार वर्षाचे हिशोब एकत्रित देणे, आर्थिक व्यवहारात, हिशोबात तफावत असणे, समाजातील सभासदांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक गरजांकडे दुर्लक्ष करणे. कोणत्याही खर्चाचे अंदाजपत्रक न देणे, अवाजवी खर्च करणे. यामुळे सामान्य सभासद संस्थेपासून दुरावला होता.

२०१४ पासून सदरची कार्यकारणी बेकायदेशीरपणे कार्यभार पाहत आहे. त्यांना २०१४ पासून एक-एक वर्ष मुदतवाढ दिलेली आहे. त्यांचा बदल अर्ज ३०४८/२०१८ माननीय धर्मदाय आयुक्तांसमोर आजपर्यंत प्रलंबित आहे.

त्यांच्या कार्यकाळात त्यांनी समाज उपयोगी कार्यापेक्षा नियम बाह्य निर्णय घेऊन आर्थिक व्यवहारात समाजाला नुकसान होणारे, प्रतिमा मलिन करणारे कार्य केले. तसेच असे अनेक छोटे व मोठे व्यवहार करताना समाज सभासदांना विश्वासात घेतले नाही व संस्थेच्या घटनेची व नियमांची पायमल्ली केली. त्यांच्याकडे केलेल्या कामाचा जाब विचारला असता उडवाउडवीची उत्तरे देणे, लोकांचे अपमान

करणे, यामुळे समाजात असंतोष पसरला होता. जसेजसे समाजातील सभासदांना या विषयाची माहिती मिळू लागली, तसे समाजात जागृती होऊ लागली व त्यामुळे जागृत सभासदांनी एकत्र येऊन याच्याविरुद्ध आवाज उठवला. त्याकरता वेळोवेळी अनेक फौजदारी केसेस या कार्यकारिणीवर अनेक बांधवांनी टाकले आहेत. तसेच समाजाला मिळालेल्या जागेबाबतच्या फौजदारी दाव्यामध्ये अध्यक्ष श्री मनोज आरसिध्द यांनी संस्थेच्या हिताविरुद्ध लेखी जबाब दिल्यामुळे सध्या जामीनावर बाहेर आहे.

असे अनेक मोठे विषय यांच्याविरोधात झाल्यामुळे समाज सभासदांचा यांच्यावर विश्वास राहिला नाही. त्यामुळे अनेक समाज बांधवांनी एकत्रितपणे येऊन त्यांच्याविरोधात सह्यांची मोहीम हाती घेतली. सह्यांच्या मोहिमेला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यामुळे व सर्वांकडून या कार्यकारिणीवर अविश्वास असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सर्वसाधारण सभा घेऊन त्यांच्यावर अविश्वास ठराव टाकणे व समाजकार्य करण्यासाठी नवीन कार्यकारणीची पायाभरणी करणेचे ठरले.

अशा प्रकारे योजनेतील कलम ९ (६) प्रमाणे सर्व साधारण सभा बोलावून त्यामध्ये सदर कार्यकारिणीवर चर्चा करून अविश्वास ठराव ठेवणे, नवीन कार्यकारणीची नेमणूक करणे, असे विषय घेऊन ती कलम १० (५) प्रमाणे सभा आयोजित केली.

सकाळी १०.३० am
सर्व साधारण सभा सुरु झाली, श्री किरण बुरबुरे व श्री गणेश दगडू यांनी सूत्रसंचालन केले. त्यांनी सर्वांचे स्वागत केले. व पुढील मिटिंग त्याच दिवशी, त्याची ठिकाणी ११ वाजता सुरु होईल व त्या सभेसाठी गणसंख्येचे बंधन राहणार नाही हे जाहीर केले.

सकाळी ११.०० am
सर्व साधारण सभा पुन्हा सुरु झाली. श्री किरण बुरबुरे यांनी कवितेने सभेची सुरुवात केली. श्री गणेश दगडू यांनी त्यांना सहकार्य केले. श्री गणेश दगडू यांनी मिटिंगचे सर्व नियम समजावून सांगितले

सकाळी ११.०५ am
श्री सचिन दगडू यांनी श्री अशोक चव्हाण यांची सभेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात यावी हे सुचविले व त्यांची ओळख करून दिली. सर्वांच्या मंजुरीने त्यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. सभेत अपेक्षेपेक्षा जास्त समाज सभासद उपस्थित आहेत, त्यामुळे गदारोळ होऊ शकतो व श्री अशोक चव्हाण यांचे शारीरिक स्वास्थ्य पाहता संभाव्य गदारोळ हाताळणे त्यांना शक्य नाही, अशी श्री किरण बुरबुरे, श्री विनेश झाड व इतर मान्यवर यांच्यात चर्चा झाली. सभा सुरळीत पार पाडण्यासाठी श्री अशोक चव्हाण यांचे परवानगीने नवीन अध्यक्ष श्री लक्ष्मण पवार यांना मंचावर आमंत्रण देण्यात आले. सभा सुरळीत पार

पाडण्यासाठी श्री लक्ष्मण पवार व श्री अशोक चव्हाण यांना सर्वांनी सहकार्य करावे असे उपस्थित मान्यवरांनी आवाहन केले. श्री अशोक चव्हाण सावजी यांनी सहस्त्रार्जुन प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. दिवंगत समाजबांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सकाळी ११.०९ am

दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ रोजी झालेली ऑनलाईन पद्धतीने झालेली सर्व साधारण सभा व त्यातील सर्व ठराव रद्द करण्यात यावे, याबद्दल श्री दत्तात्रय धोंडाळे सावजी यांनी प्रस्ताव मांडला.

सभेत पुढील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

**ठराव क्रमांक १ :**

**दिनांक १४/२/२०२२ रोजी ऑनलाईन पद्धतीने झालेली सर्व साधारण सभा व त्यातील सर्व ठराव रद्द करणे याबाबत,**

ऑनलाईन बैठक घेणे, याबद्दल योजनेत कोणतीही तरतूद नाही. कार्यकारणीस प्रत्यक्ष उपस्थितीत बैठक घेणे शक्य असतानाही बळजबरीने ऑनलाईन बैठक घेण्यात आली.

'दिनांक १४/०२/२०२२ रोजी झालेल्या ऑनलाईन बैठकीत सादर केलेले सर्व ठराव रद्द करणे' याविषयी अध्यक्षांच्या परवानगीने श्री मनोज काटवे यांनी आपल्या समाजातील अनेक सभासदांचा शैक्षणिक स्तर पाहता व काही वयस्कर समाजबांधवांच्या हरकतीनुसार ऑनलाईन मिटिंग सोयीची नाही असे नमूद केले. तसेच अनेक सभासदांकडे अद्ययावत मोबाईल संच नाही व अनेक ठिकाणी इंटरनेट ची सुवीधा नाही. त्यामुळे हि ऑनलाईन सभा घेणे हे चुकीचे आहे व समाजाला प्रत्यक्ष उपस्थिती मध्ये मिटिंग हवी होती असे भाषण केले. त्यामुळे श्री मनोज काटवे यांनी दिनांक १४/२/२०२२ रोजी ऑनलाईन पद्धतीने झालेली सर्व साधारण सभा व त्यातील सर्व ठराव रद्द करण्यात यावेत, याची विनंती केली.

समाजातील काही जेष्ठ सभासदांनी ऑनलाईन बैठक रद्द व्हावी व प्रत्यक्ष उपस्थितीत बैठक घ्यावी यासाठी सत्याग्रह आंदोलन पुकारले होते. खडक पोलीस स्टेशन मधील निरीक्षकांनी दिनांक १३/०२/२०२२ रोजी याची दखल घेऊन ऑनलाईन बैठक रद्द करावी असा स्पष्ट आदेश दिला असतानाही पोलिसांच्या आदेशाचे पालन न करून ऑनलाईन बैठक घेण्यात आली.

सदर ऑनलाईन बैठकीत संस्थेचे अध्यक्ष उपस्थित नव्हते.

समाजातील जवळपास २०० सभासदांनी विविध माध्यमांतून व व्हाट्सअँपवर तसे सूचक दिले असताना व प्रत्यक्ष लेखी अर्ज केला असताना, **खडक पोलीस स्टेशन मधील पोलिसांचे 'मिटिंग रद्द करावी' असे स्पष्ट लेखी दिलेले आदेश** व **समाजातील जवळपास २०० सभासदांचे म्हणणे धुडकावून** श्री मनोज आरसिद्ध कार्यकारिणीने जबरदस्तीने ऑनलाईन मिटिंग घेऊन अनेक चुकीचे ठराव संमत करून समाजाची दिशाभूल केली.

सदर ऑनलाईन बैठकीत केवळ १०० च्या आसपास सभासद उपस्थित होते. अनेक सभासद जे तांत्रिक कारणांमुळे ह्या बैठकीत उपस्थित राहू शकले नाहीत, त्यांना आपले म्हणणे मांडता आले नाही त्यामुळे सदर ऑनलाईन बैठक बेकायदेशीर व अन्यायकारक आहे.

श्री लक्ष्मण पवार यांनी ऑनलाईन मिटिंग मध्ये झालेले ठराव किती चुकीचे होते हे विस्ताराने समजावून सांगितले. समाजातील विदारक सत्य त्यांनी सांगून सर्व समाज बांधवांना जागृत करणे हे या बैठकीचे मूळ उद्दिष्ट आहे, हे सांगितले. समाजाने जागृत होणे हि काळाची गरज आहे. हे समजावून सांगितले.

सकाळी ११.२८ am

**दिनांक १४/२/२०२२ रोजी ऑनलाईन पद्धतीने झालेली सर्व साधारण सभा व त्यातील सर्व ठराव रद्द करणे हा ठराव आवाजी मतदानातून बहुमताने मंजूर झाला. असे किरण बुरबुरे यांनी जाहीर केले.**

**सूचक : श्री दत्तात्रय धोंडाळे** **अनुमोदन : श्री मनोज काटवे**

**ठराव क्रमांक २ :**

**सद्य कार्यकारिणीवर अविश्वास ठराव, चर्चा व निर्णय.**

सकाळी ११.३० am

श्री मेघश्याम झाड यांनी अविश्वास ठरावाची कारणे सर्वांना समजावून सांगण्यास सुरुवात केली. कार्यकारिणीला देण्यात आलेली मुदतवाढ व त्यामागील अपेक्षा वाचून दाखविल्या. ऑनलाईन मिटिंगला विरोध असतानाही बळजबरीने ऑनलाईन मिटिंग घेतली. तसेच कार्यकारिणीने धर्मादाय आयुक्तांकडे केवळ पुढील तारखा घेऊन तेथील बदल अर्ज निकाल प्रलंबित ठेवला. संस्थेच्या लाभार्थी सभासदांपैकी एका लेखा परीक्षकानेच ४ वर्षाचा अहवाल केला व पुन्हा त्याच अहवालाचे त्यांनीच परीक्षण केले, हे पूर्ण चुकीचे आहे असे श्री विनेश झाड यांनी सांगितले. तसेच लेखा परीक्षकातील अनेक शेरे कार्यकारिणीतील

अनेक विश्वस्तांना माहितीच नव्हते व अनेक विश्वस्त याबाबतीत अनभिद्न्य होते, हे सविस्तर उदाहरण देऊन प्रस्तुत केले.

चुकीची माहिती देऊन परवानगी मिळवून दिनांक ११ मार्च रोजी स्वारगेट येथील झाड पाडण्याचे कृत्य करण्यात आले, असे श्री मेघश्याम झाड यांनी सांगितले. तसेच झाड पाडण्यात आले तेव्हा लोखंडी खांबात उच्च विद्युत प्रवाह सुरु होता व निष्काळजीपणामुळे समाजबांधवांचे जीव धोक्यात आले असे श्री मनोज काटवे यांनी नमूद केले.

श्री संजय भांडगे यांनी 'श्री सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्ट' या नावाचा ट्रस्ट अस्तित्वात नाही. असे नमूद केले व आपल्या ट्रस्ट विषयी अनेक प्रश्न उपस्थित केले. त्यांस श्री लक्ष्मण पवार यांनी उत्तरे दिली. सौ अंजली खत्री यांनी विषयांतर होऊ नये व केवळ विषय पत्रिकेवरील विषय घेण्यात यावेत हे सांगितले. श्री लक्ष्मण पवार यांनी ट्रस्टला झालेल्या दंडाच्या रक्कमेबद्दल खुलासा केला. श्री संजय भांडगे यांनी ट्रस्ट चे नाव दुरुस्त करणे आवश्यक आहे, असे नमूद केले. श्री लक्ष्मण पवार यांनी याबद्दल ऑनलाईन मिटिंग मध्ये काहीच चर्चा झाली नाही, याबद्दल विवेचन केले. श्री बाळासाहेब झाड यांनी या संदर्भातील योजनेमधील प्रस्तावना वाचून दाखविली.

सद्य श्री सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्ट पुणे ची वारंवार मुदतवाढ मिळालेली कार्यकारणी खालील प्रमाणे :

1. अध्यक्ष : श्री मनोज आरसिद्ध
2. उपाध्यक्ष : श्री यल्लेश रंगापूरे
3. सेक्रेटरी : श्री अनिल दामजी
4. हिशोबी तपासनीस : श्री अशोक कटारे.
5. खजिनदार : श्री राजेश कुक्कर
6. सदस्य : श्री प्रदीप काटवे
7. सदस्य : श्री योगेश काटवे
8. सदस्य : श्री राजेंद्र भांडगे
9. सदस्य : श्री नितीन धोंगडी
10. सदस्य : श्री उमेश आरसिद्ध
11. सदस्य : श्री संतोष बाकळे
12. सदस्य : सौ आशा चव्हाण
13. सदस्य : सौ लीना मामर्डे
14. सदस्य : सौ सुवर्ण झाड
15. सदस्य : सौ अलका भांडगे

यांचे वर खालील कारणांमुळे अविश्वास ठराव.

1. संस्थेच्या योजनेतील **कलम १८** प्रमाणे कार्यकारणीचा **कार्यकाल फक्त ५ वर्षे असेल** अशी तरतूद आहे. दिनांक ३०/०७/२०१८ रोजी संस्थेच्या विशेष सर्व साधारण सभेत '**निवडणूक प्रक्रिया हि वेळखाऊ व किचकट आहे' त्यामुळे निवडणूक घेतली गेली नाही.** हि नेमणूक ३०/०७/२०१८ च्या विशेष सर्व साधारण सभेमध्ये सल्लागार समिती व निवडणूक समिती यांच्या मध्ये सल्ला मसलत होऊन केलेली आहे. तसेच सदर नेमणूक हि सभासदांमधून निवड वा निवडणूक प्रक्रिया न करता केलेली आहे. **सदरची नेमणूक हि फक्त १ वर्षाकरिता केलेली असून तसा उल्लेख संस्थेच्या योजनेतील कलम १८ मध्ये नमूद आहे**. सदर योजनेतील कलम १८ प्रमाणे अशी नेमणूक हि फक्त १ वर्षासाठीच करता येत असल्याने **सदर कार्यकारणीचा कार्यकाल योजनेप्रमाणे संपलेला आहे.** तरीही आज संस्थेचा सर्व कारभार सदर समिती बेकायदेशीर रित्या पाहत आहेत. तसेच दिनांक १४/२/२०२२ रोजीच्या ऑनलाईन वार्षिक सर्व साधारण सभेत कार्यकाळ वाढवून घेणे बाबत कोणतीही चर्चा केली नाही व असा कोणताही ठराव पारित केला गेला नाही. **तसेच योजनेतील कलम ९ (६) प्रमाणे सदर पदाधिकारी यांचे विरुद्ध अविश्वास ठराव पारित करणे न्यायाचे आहे** अशी चर्चा करण्यात आली.

2. कार्यकारिणीची दिनांक ३०/०७/२०१८ रोजी संस्थेच्या विशेष सर्व साधारण सभेत त्यांची नेमणूक झाल्यावर योजनेतील कलम ११(१), ११(२) प्रमाणे वर्षातून किमान एकदा किंवा १५ वा १८ महिन्याच्या आत सर्वसाधारण सभा बोलावली नाही तर सदर कार्यकारणी आपोआप बरखास्त होईल, अशी तरतूद आहे. सदर कार्यकारिणीने सन २०१९, २०२०, २०२१ या तीनही वर्षात कुठल्याही प्रकारची वार्षिक वा विशेष सर्व साधारण सभा घेतली नाही. **त्यामुळे सदर कार्यकारणी योजनेतील कलम ११ (१), ११ (२) प्रमाणे आपोआप बरखास्त झालेली आहे.** तरीही आज संस्थेचा सर्व कारभार सदर समिती बेकायदेशीर रित्या पाहत आहे.

3. दिनांक ३०/०७/२०१८ रोजी घेतलेल्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी सदर कार्यकारिणीने विश्वस्त कायद्याचे पालन केले नाही. **योजनेतील कलम १० (५)** प्रमाणे सभेची नोटीस स्थानिक वर्तमान पत्रात देण्याची तरतूद आहे परंतु कोणत्याही स्थानिक वर्तमान पत्रात सदर बैठकीची कोणतीही नोटीस देण्यात आली नाही. त्यामुळे **योजनेतील कलम १० (५) चे उल्लंघन केले**.

4. योजनेतील **कलम ३६ (१)** प्रमाणे, कार्यकारणी समिती त्यांच्या कार्यकाळ संपण्याअगोदर ४ महिने त्यांच्या सभेमध्ये निवड वा निवडणूक प्रक्रिया करण्यासाठी समाजातील ३ सभासदांची निवड वा निवडणूक समितीसाठी नेमणूक करेल. अशी तरतूद आहे. परंतु अशी प्रक्रिया देखील झाली नाही.

5. अखिल भारतीय बेंगलोर समितीच्या दिनांक १५/८/२०२१ रोजी मिळालेल्या अंतिम अहवालातील शिफारस पुढीलप्रमाणे :

*It is seen that the present SSK Samaj (Trust) Pune is continued from the year 2014, with certain changes effected by the resolutions passed by the General body meeting held on 27.03.2017 and subsequently by the Managing Committees also.,* ***The endorsement from the office of the Assistant Charity Commissioner, Pune is still not received for having made the submissions in this regard.*** *ABSSK Samaj, Bangalore has observed a number of lapses by various managing Committees for a large period of time. Many aspects, require immediate action and attention to establish harmonial and ideal Samaj in the best interest of SSK Samaj Pune on the whole.*

*FOLLOWING ACTIONS ARE RECOMMENDED*

*(i) To update the members list and take up membership drive to enable participation of the wider cross section of the SSK Samaj (Trust) Pune.*

*(ii) To modify the byelaws of the SSK Samaj (Trust) Pune, to synchronies with the present requirements and to avoid ambiguities for better functioning of the SSK Samaj (Trust) Pune.*

*(iii) To Formulate an ad-hoc/, Managing Committee involving the present enquiry Committee and the SSK Prantiya Samaj, Maharastra and dissolve the present Managing Committee of SSK Samaja (Trust) Pune, forth with.,*

*(iv) To call for General Body meeting and conduct elections to elect new Managing Committee as per the clases of the byelaws of the SSK Samaj (Trust) Pune within three months.*

6. दिनांक ७/४/२०२१ रोजी मे.धर्मादाय आयुक्त निरीक्षक अहवालातील विश्वस्त कायद्याचे उल्लंघन केल्याचे आयुक्तांचे ताशेरे पुढील प्रमाणे.

*"निरीक्षक अहवाल वाचन केले. त्यानुसार श्री. सो. स. क्षत्रिय ट्रस्ट या न्यासाचे विश्वस्तांनी सन* ***२०१५-१६ व २०१७-१८ या कालावधीत दिलेल्या देणग्या व प्राप्त देणग्या रकमेबाबत तफावत तसेच मुदतठेवी पावत्या गहाळ करणे या बाबी केल्याचे मान्य केले असून त्यांनी पैशाचे अपहार केल्याचे निदर्शनास येत आहे.*** *त्यामुळे पुन्हा कारणे दाखवा नोटीस काढून त्याचा खुलासा मागणेची आवश्यकता नाही असे वाटते. तरी मान्य झाल्यास* ***संबंधित विश्वस्थांविरुद्ध म. सा. वि. व्य. द्वारी १९५० चे कलम ४१ ड ( a ) ( c ) व ( d ) चे उल्लन्घन केले म्हणून सदरहू***

***चौकशी करणेबाबत** कार्यवाही करणे बाबत."*

7. आळंदी ची जागेबद्दल कोर्टात खालील प्रमाणे सदर कार्यकारिणीने बेजबाबदारपणे लिहून दिले आहे कि,
*'परिच्छेद क्र. ६ H जाब देणार यांना मान्य व कबुल नाही. सदरची मिळकत हि श्री संजय गुरुनाथ भांडगे, श्री राजेंद्र गुरुनाथ भांडगे, श्री सुभाष गुरुनाथ भांडगे यांच्या वैयक्तिक मालकीची होती. त्याचा जाब देणार संस्थेशी व जाब देणार **विश्वस्तांशी काहीही संबंध नाही.**'* असे लिहून समाजाची दिशाभूल केली. सदर दिघी पोलीस स्टेशन तर्फे दाखल फौजदारी गुन्हा नं. **९६/२०२१** नोंदविलेला आहे. सध्या खडकी कॅन्टोन्मेंट कोर्ट, पुणे येथे केस (R.C.C./८१/२०२२) चालू आहे. सद्य कार्यकारिणीचे अध्यक्ष जामिनावर आहेत.

8. सदर आळंदीची जागा हि ज्या मृत्यपत्राद्वारे श्री सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्ट च्या नावे करण्यात आली, **त्याच मृत्युपत्रात विश्वस्त पदावरील दोन विश्वस्त लाभार्थी असताना देखील सदर अध्यक्ष व कार्यकारणीला सदर मृत्यपत्राबाबत काहीही माहित नाही, असे धादांत खोटे विधान केले. त्याविषयक कोणतीही कागदपत्रे आढळून आली नाही, असे त्यांचे विधान हे समाजाची दिशाभूल करणारे आहे.** याबाबत निशाणी १६ नुसार दिलेल्या कलम ४१ डी प्रकरण ६२/२०१६ च्या जबाबात पॅरा ९ अन्वये अध्यक्षांनी असे खोटे व निष्काळजीपणाने विधान केले.

9. अखिल भारतीय बेंगलोर समितीने दि. १५/८/२०२१ रोजी प्रस्तुत न्यासाच्या बाबतीत अभ्यास करून दिलेल्या अहवालातील अनियमित कारभार व सदोष कार्यपद्धती यामुळे सदर कार्यकारणी तहकूब करणेची शिफारस केली आहे. सदर अहवाल समाजापासून दडवून ठेवण्यात आला. परंतु अहवालातील दिलेल्या शिफारशी अमलांत आणल्या नाही.
अखिल भारतीय बेंगलोर समितीच्या अहवालातील शिफारस पुढील प्रमाणे :

*This is a donated property. From the date of donation and further substantiated by the registered deed, the then committee and **Successive Committees being fully aware of the happenings, it is very strange no action has been taken in this regard. This indicates deliberate negligence on the part of the then and successive committee**s not to have taken any action against the executors of the will for fraudulent transactions said to have been made by them in spite of the fact that they were also with SSK Samaj (Trust) Pune*

10. न्यासाच्या दुसऱ्या पॅनकार्ड मधील झालेला आर्थिक व्यवहार अहवालात लपवणे. अखिल भारतीय बेंगलोर समितीच्या अहवालातील शिफारस पुढील प्रमाणे :

*There are two Pancards appearing in this connection as follows:*

a. ***AACTS5342P** in the name of*
*"SRI SOMAVANSHIYA SAHASTRAJUN KSHTRIYA SAMAJ TRUST" (which is in operation)*

b. ***AADTS 0758E** – in the name of*
*"SOMAVAMSHIYA SAHASRAJUH KSHA TRIYA SAMAJ TRUST", (Suspected to have been got registered for fraudulent transactions – which is said to be active as on date)*

*The details of remittances and withdrawals made vide pancard (b) are said to have not been reflected in the accounts / balance sheet of the "Sri Somavanshiya Sahasrajun Kshatriya Samaj (trust).,Pune.*

*The very distorted "nomenclature" of the pancard suggests that **someone connected to the samaj committee might have obtained this pancard for vested interest** as it could be seen that transactions are being made fraudulently.*

याबाबत दि. ९/११/२०२१ रोजी FIR दाखल असून त्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली.

11. आर्थिक खर्चाची बिले प्रत्यक्षात ऑडीट समयी उपलब्ध न करणे. सन २००८ ते सन २०१७ च्या हिशोबात लेखापरीक्षकाने "During the audit period we relied on internal voucher prepared by trust. **No external evidence is available** to verify of authentication of transaction" असा शेरा देण्यात आलेला आहे. याचा अर्थ असा कि अनेक छोटे मोठे खर्च करताना पक्की बिले न घेता केवळ व्हाउचर्स जोडली आहेत व त्यामुळे खर्चाबाबत साशंकता आहे. ऑडिट रिपोर्ट हा qualify केला आहे.

12. ट्रस्ट लाभार्थी सभासदांकडून लेखापरीक्षण केल्याबद्दल नियम बाह्य वर्तणूक/कृत्य केले. 'लेखापरीक्षक व सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारे हितसंबंध असता कामा नये

किंवा संस्थेशी तो संबंधित असता कामा नये.' या नियमाचे उल्लंघन केले गेले व विश्वस्त व्यवस्थेतीलच सदस्यांकडून लेखापरीक्षण करून घेतले. याबद्दलचा सबळ पुरावा उपलब्ध आहे. तसेच २०१७ च्या सर्व साधारण सभेत ठरल्याप्रमाणे २००८ ते २०१८ चा हिशोब त्रयस्थ लेखा परीक्षाकडून करून घेण्याचा ठराव केला होता. परंतु असे असताना पुन्हा संस्थेशी संबंध असलेल्या त्याच लेखापरीक्षकाकडून त्यानेच केलेले ऑडिट रिपोर्ट पुन्हा ऑडिट करून घेतले गेले. असे करत असताना कोणत्याही एका वर्षाच्या अहवालात जुन्या व नवीन ऑडिट रिपोर्ट मधील रकमेत खूप तफावत आढळून आलेली आहे.

13. सदर कार्यकारणीचे बदल अर्ज ३०४८/२०१८ प्रोव्हिजनल सिद्ध करण्यासाठीच्या अर्जावर धर्मादाय कोर्टाने १७/१२/२०१९ रोजी आदेश करून सदर अर्ज मूळ बदल अर्जासोबत चालवणेचा हुकूम केला, तरीही २०२२ साल उजाडले, तरी प्रलंबित ठेवले. सन २०१८ पासून योग्य रीतीने पाठपुरावा न केल्याने मूळ बदल अर्ज आजतागायत प्रलंबित आहे. सदर प्रोव्हिजनल अर्ज हा स्वारगेट येथील बांधकामाचा नकाशा मंजूर करणेसाठी केला होता. परंतु प्रोव्हिजनल अर्ज रद्द झाल्याने जागांचे ताबे समाजाला वेळच्या वेळी मिळाले नाही व त्यातून समाजाचे अतोनात नुकसान झाले.

14. खडक पोलीस इन्स्पेक्टर यांनी १४/०२/२०२२ रोजीची ऑनलाइन बैठक रद्द करणेचा आदेश दिनांक १३/०२/२०२२ दिला असताना सदर आदेश समाजापासून लपविला, आदेश धुडकावून बैठक घेतली व कायदा मोडला. ऑनलाईन बैठक घेण्याची योजनेत कोणतीही तरतूद नसताना हि सदर बैठक घेण्यात आली. व त्यामुळे घेतलेली सदर बैठक हि बेकायदेशीर झाली आहे.

15. ट्रस्ट लाभार्थी सभासदांकडून ऑफलाईन मिटींग घेणेबद्दल सत्याग्रह जनआंदोलन झाले असताना, दखल न घेणे, चर्चा न करणे, हा लाभार्थी सभासदांचा, ज्यांच्यामुळे कार्यकारीणी पदावर आहे, त्यांचा अवमान केला.

16. सदर कार्यकारिणीने ३ वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे सेक्रेटरी दाखवून समाजाची, धर्मादाय आयुक्त, पतपेढी, बँक व कोर्टाची दिशाभूल केली आहे.

17. सदर ट्रस्ट च्या स्वारगेट जागेतील होर्डिंगच्या रेट मधील अनियमित बदल व त्यामुळे संस्थेला जवळपास अतोनात नुकसान झाले.

18. पिंपळाचे झाड अनधिकृतपणे व चुकीची परवानगी घेऊन पाडले. सदर पिंपळाचे झाड अजिबात धोकादायक झाले नव्हते परंतु काही अज्ञात कारणाने हे झाड पाडण्याचा प्रयत्न केला गेला. झाड

पाडत असताना लोखंडी खांबाला विजेचा शॉक बसून एक इसम जखमी होऊन ४० फुटांवरून खाली पडला. **समाजाला याची काहीही माहिती दिली** नाही व सदर इसमाचे नाव, व त्याची शारीरिक स्थिती हि देखील समाजापासून लपवून ठेवली गेली. शॉक बसून इसम जखमी झाल्यानंतर देखील **लोखंडी खांबातून वीजप्रवाह धोकादायक पद्धतीने चालू होता** व याने अनेक समाज सभासदांचे जीव धोक्यात आले.

19. सदर कार्यकारिणीने आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये जवळपास ३० लाख रुपयांच्या ठेवी मोडून बांधकाम नकाशा मंजूर करण्यासाठी सर्व साधारण सभेची कोणतीही चर्चा केली नाही वा मंजूरी घेतली नाही.

20. श्री सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्ट स्वारगेट येथील ५००/७०० वर्षे पुरातन विष्णू मंदिर, दशमुखी भवानी मातेचे मंदिर पाडण्याची योजना सर्व साधारण सभेची मंजुरी न घेता बांधकाम नकाशात दाखविली व नकाशा मंजूर करून घेतला.

21. दिनांक १७/४/२०२१ रोजी बेलीफ स्वारगेट येथील भाडेतत्वावर दिलेल्या जागेचा ताबा देण्यास आला असताना, बेलीफ केवळ सर्वे करण्यासाठी आला होता असे गैरसमज पसरविले. बेलीफ जागेचा ताबा देण्यास आला असताना चुकीचे निर्णय घेतल्यामुळे जागा ताब्यात घेता आली नाही.

इतके सर्व पुराव्यानिशी आरोप असताना व संपूर्ण समाज सदर तथाकथित कार्यकारणी विरुद्ध वारंवार जाब विचारात असताना देखील समाजाची सातत्याने दिशाभूल श्री मनोज आरसिद्ध अध्यक्ष व कार्यकारणी करीत आहे. म्हणून पुणे समाज सभासद **योजनेतील कलम 'सभासदांचे अधिकार ९ (६)' प्रमाणे सदर संपूर्ण कार्यकारिणीवर** अविश्वास ठराव ठेवीत आहे.

**दुपारी १२.१८ pm**

**श्री मेघश्याम झाड यांनी अविश्वास ठराव मंजुरीसाठी ठेवला. अविश्वास ठराव आवाजी मतदानाने बहुमताने मंजूर झाला व नमूद सर्व १५ सदस्यांची कार्यकारणी बहुमताने बरखास्त झाली. असे श्री किरण बुरबुरे यांनी घोषित केले.**

**सूचक : श्री भरत कोल्हापुरे** **अनुमोदन : सौ. माया भांडगे**

**ठराव क्रमांक ३ :**
**नवीन कार्यकारणी व पदाधिकाऱ्यांची निवड.**

दुपारी १२.२० pm, :
श्री लक्ष्मण पवार यांनी इच्छुक उमेदवारांनी समाजकार्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले. त्या आवाहनास प्रतिसाद देऊन अनेक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन कार्यकारिणीवर येणाची इच्छा दर्शविली. श्री लक्ष्मण पवार यांनी समाजातील जाणकार सभासदांना एकत्र येऊन एक नवीन कार्यकारणी ज्यात सुशिक्षित, तरुण, प्रौढ, महिला व समाजातील विविध क्षेत्रात काम करणारे मान्यवर यांना घेऊन समाजाच्या प्रगतीसाठी एकत्र घेऊन कार्य करण्यात येईल असे सुचविण्यात आले. नवीन कार्यकारिणीची मुदत दिनांक २०/०३/२०२२ पासून पुढे ५ वर्षे राहील. असे त्यांनी जाहीर केले. योजनेतील कलम १९ (१) प्रमाणे कार्यकारणी वर १५ सदस्य असतील अशी तरतूद आहे.

श्री सो. स. सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट पुणे यांचे अध्यक्षपदी उपस्थित श्री विनेश झाड यांचे नाव सुचविण्यात आले.

सर्व सभासदांमधून सन २०२२ ते २०२७ साठी बहुमताने निवडलेल्या कार्यकारणीची नावे व पदे पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १. श्री. विनेश प्रकाश झाड | - अध्यक्ष |
| २. श्री. मेघश्याम मोतीराम झाड | - उपाध्यक्ष |
| ३. श्री. मनोज मनोहर काटवे | - कार्यवाह |
| ४. सौ. मोनाली मनीष खेरुड | - खजिनदार |
| ५. सौ. अंजली निलेश खत्री | - हिशोब तपासणीस |
| ६. श्री. योगेश विजय साधू | - उपकार्यवाह |
| ७. श्री. गणेश किरण खानापूरे | - सदस्य |
| ८. श्री. अजय नंदकुमार चौधरी | - सदस्य |
| ९. श्री. दत्तात्रय रामचंद्र धोंडाळे | - सदस्य |
| १०. श्री. ऋषिकेश राजू कोल्हापुरे | - सदस्य |
| ११. श्री. किरण देविदास बुरबुरे | - सदस्य |
| १२. श्री. आकाश अंकुश कोल्हापुरे | - सदस्य |
| १३. श्री आदित्य जितेंद्र झाड | - सदस्य |
| १४. डॉ. सौ. शुभांगी प्रवीण वाळवेकर | - सदस्या |
| १५. सौ. अनुराधा योगेश चव्हाण | - सदस्या |

**दुपारी १२.२४ pm**
**श्री किरण बुरबुरे यांनी नवीन कार्यकारणीचे ठराव मंजुरीसाठी ठेवला. कार्यकारणीचे पदाधिकारी हेच विश्वस्त असतील. नवीन कार्यकारणी निवडीचा ठराव आवाजी मतदानातून बहुमताने मंजूर झाला व वर नमूद कार्यकारणी श्री विनेश झाड यांचे अध्यक्षतेखाली कार्य करेल हे श्री किरण बुरबुरे यांनी जाहीर केले.**

**सूचक : श्री विजय कोल्हापुरे** **अनुमोदन : श्री माणिक दलभंजन**

दुपारी १२.२५ pm
श्री लक्ष्मण पवार व श्री अशोक चव्हाण, यांनी श्री विनेश झाड व नवीन कार्यकारणीस शुभेच्छा दिल्या. तसेच उपस्थित सभासदांनी टाळ्या वाजवून नवीन कार्यकारणीस शुभेच्छा दिल्या. श्री.विनेश झाड यांनी त्यांचेवर विश्वास दाखविल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

दुपारी १२.२७ pm
श्री दीपक पवार यांनी पुणे समाजाच्या प्रगतीबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी समाज कार्यात मदत करण्याचे सर्वांना आवाहन केले.

दुपारी १२.३० pm
श्री अशोक चव्हाण यांनी समाजातील मतभेद मिटवून सर्वांनी एकत्र येऊन समाजकार्य करावे हि विनंती सर्वांना केली.

दुपारी १२.३२ pm
श्री मनोज काटवे यांनी समाजाच्या पटलावर शेकडो विषय प्रलंबित आहेत आणि प्रत्येक प्रश्नांसाठी एकत्र येऊन मार्ग काढणे गरजेचे आहे असे सांगितले. तसेच विश्वस्तांचे उत्पन्न हि केवळ विश्वस्तांचे नसून ते संपूर्ण समाजाचे आहे. त्यामुळे सर्व उपसंस्था यांना हे उत्पन्न हक्काने विभागून देण्यात येण्याची आवश्यकता आहे हे नमूद केले. नवीन कार्यकारणी लवकरच याविषयी निश्चित धोरण आखून काम करेल असे आश्वासन दिले.

दुपारी १२.४१ pm

श्री निलेश खत्री यांनी ह्या बैठकीचे  वार्तांकन वेळेवर सादर करावे हि विनंती केली. तसेच एका ठराविक काळानंतर जसे कि दरमहा किंवा दर तीन महिन्यांनी, समाजात होणाऱ्या सर्व घडामोडी समाज बांधवांना पाठविण्यात येणे. हि विनंती केली. श्री विनेश झाड यांनी हि विनंती मान्य केली. समाजाने एकत्र येऊन कार्य करणे आवश्यक आहे व सर्व युवकांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. सर्वांनी आपण समाजासाठी काय करू शकतो याचा विचार करणे. असे त्यांनी अनेक समाजबांधवांना आवाहन केले.

दुपारी १२.४६ pm

श्री गणेश दगडू यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. **तसेच बैठकीसाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री बाळासाहेब झाड यांचे आभार मानले.**

दुपारी १२.४७ pm

सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली व राष्ट्रगीताचे पठण करण्यात आले.

मनोज काटे
सेक्रेटरी

Laxman A Pawar
सभा अध्यक्ष

विनेश झाड
अध्यक्ष